आर.सी.सी. क्र. २७१/२०२२
सरकार विरुध्द नारायण
निशाणी क्र.१८

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ यांची जबानी**
**मी प्रतिज्ञा पूर्वक निवेदन करतो की,**

| | |
|---|---|
| माझे नाव | – लक्ष्मण सतीशराव कवटेकवार, |
| वय | – ३० वर्ष |
| धंदा | – व्यवसाय, |
| राहणार | – ताडकळस, ता. पुर्णा जि. परभणी. |

**सरतपास सरकार तर्फे श्री. पी. एन. सोळंके, सहायक सरकारी वकील यांचे मार्फत**

१. मी आरोपीस ओळखतो. मला पोलीसांनी कोणताही पंचनामा करण्याकरिता कोठेही बोलावले नव्हते. पोलीसांनी माझ्यासमक्ष कोणताही जप्ती पंचनामा केलेला नाही. तसेच पोलीसांनी माझ्यासमक्ष कोणतीही वस्तू जप्त केलेली नाही. आता मला अभिलेखावरील पंचनामा दाखवण्यात आला, सदर पंचनाम्यावरील अनुक्रमांक २ वरील सही माझी असून ती मी ओळखतो. सदर पंचनाम्यातील मजकूराबाबत मला काहीही माहिती नाही. साक्षीदाराने सही ओळखल्यामुळे सहीस **निशाणी क्र. १९** देण्यात येते.

***साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली.***

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३.०२.२०२२ रोजी सायंकाळी ०७.३० ते ०८.३० च्या दरम्यान पोलीसांनी मला ताडकळस पोलीस ठाण्यात

बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर ठिकाणी इतर पंच म्हणून लहू बळीरामजी अंभोरे उपस्थित होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर ठिकाणी माझ्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातून एक पांढऱ्या रंगाचा छोटा हत्ती क्र. एम. एच. ०४ इ व्ही १५४५ हा जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, सदर वाहनातून प्रत्येकी पन्नास किलो वजनाचे एकूण चौदा कट्टे (पोते) एकूण आठ क्विंटल वजनाचा तांदूळ, प्रत्येकी साठ किलो वजनाचे एकूण सहा कट्टे एकूण चार क्विंटल वजनाचा शासकीय गहू असा एकूण १,३०,०००/– रुपये किंमतीचा मुद्देमाल सदर पोलीसांनी माझ्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातून जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा माझ्यासमक्ष तयार करुन मला वाचून दाखवून मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझा गावातील असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उत्तर सूचक प्रश्न संपले.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपी विधीज्ञ श्री. एन. के. पठाण यांच्यामार्फत नाकरण्यात आला.**

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–
(एस. एस. साळुंखे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
पूर्णा.

दिनांक – १८.०७.२०२६